४:०० / ९.१.२०२४


# उल्हासनगर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


दिनांक : ०९/०१/२०२४

# प्रेसनोट

समग्र शिक्षा समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत विशेष गरजा असणाऱ्या दिव्यांग मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवण्याकरिता केंद्र स्तर, शाळा स्तर ,शाळेतील शिक्षकांना व अंगणवाडी शिक्षक, आशा वर्कर यांची जनजागृती होणे आवश्यक आहे याकरिता नवनवीन उपक्रम नवीन विचार, तंत्र पद्धती व संकल्पनांचा उदय इत्यादी कार्यक्रम दरवर्षी समग्र शिक्षा उपक्रमाअंतर्गत घेण्याबाबत केंद्र व राज्य शासनाने आदेशित केले आहे. त्या अनुषंगाने दिनांक ९ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ११ ते २ या वेळेत महासभा सभागृह, दुसरा माळा येथे कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेत कॅन्सर या आजाराबाबत जनजागृती, दिव्यांग जनजागृती सकारात्मक व प्रेरणादायी व्याख्यान या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. सदर कार्यशाळेत भन्तेजी एस कुमार स्थवीर यांच्यामार्फत प्रेरणादायी व्याख्यान घेण्यात आले होते. सदर उद्बोधन कार्यशाळा घेण्याकरिता माननीय आयुक्त तथा प्रशासक श्री अजिज शेख साहेब यांनी मान्यता दिली. सदर कार्यशाळेमध्ये शाळेतील सर्व मुख्याध्यापक ,केंद्रप्रमुख सामाजिक संस्था, बचत गट मधील महिला स्वयंसेवी संस्था, अंगणवाडी शिक्षिका आशा वर्कर, दिव्यांग युनियनचे अध्यक्ष मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर जनजागृती कार्यक्रम माननीय आयुक्त तथा प्रशासक अजिज शेख साहेबांच्या प्रेरणेने घेण्यात आले. सदर उद्बोधन कार्यशाळेमध्ये भंतेजी एस कुमार रघुवीर यांनी निसर्ग मार्गाचा स्वीकार म्हणजे सत्याचा साक्षात्कार याबाबत प्रेरणादायी मार्गदर्शन केले .तसेच स्पर्श फाउंडेशनचे डॉक्टर अश्विन पाटील यांनी कॅन्सर जनजागृती ,स्त्रियांचे शारीरिक आजार याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. समग्र शिक्षा विभागाचे कर्मचारी यांचे मान्यवरांच्या हस्ते विशेष कौतुक करण्यात आले. तसेच कार्यक्रमाचे उद्घाटन माननीय उपायुक्त शिक्षण डॉक्टर सुभाष जाधव साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. सदर कार्यशाळेचे संपूर्ण नियोजन समग्र शिक्षा च्या जिल्हा समन्वयक सौ संगीता लहाने-काळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नामदेव भालेराव यांनी केले व तसेच कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता राजश्री पाटील, हर्षदा नक्षीवाले ,मनीषा पवार, अमोल साबळे, योगेश मराठे, असलम शेख,राजेश साळवे, नाना चौगुले, हरि आलाट, शैलेश मोरे,राजन बैसाणे , राजेश साळवे, उदासी , मनीषा अहिरे यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाची प्रसिद्धी देण्याकरिता जनसंपर्क अधिकारी छाया डांगळे यांचे समग्र शिक्षा विभागामार्फत विशेष आभार मानण्यात आले. तसेच कार्यक्रमांमध्ये दिव्यांग विभाग प्रमुख राजेश घनघाव, महिला बाल कल्याण चे नितेश रंगारी उपस्थित होते. सदर कार्यशाळेत २०० पेक्षा अधिक शिक्षकांचा सहभाग होता.

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त. उल्हासनगर महानगरपालिका
प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

- पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
- सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
  - सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.